**सन 2023 मधील सर्वसाधारण बदल्यांच्या अनुषंगाने लिपीक संवर्गातील कर्मचा-यांच्या वास्तव्य कालावधीच्या तात्पुरत्या जेष्ठता यादया प्रसिध्द करण्याबाबत.**

क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-4/वशि/786/2023
यवतमाळ जिल्हा परिषद,यवतमाळ
सामान्य प्रशासन विभाग
यवतमाळ दिनांक :- 26 एप्रिल 2023

वाचा :- 1) शासन निर्णय(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14, दिनांक 15 मे 2014
2) शासन शुध्दीपत्रक(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-414/प्र.क्र.112/आस्था-14, दिनांक 2 जुलै, 2014
3) शासन शुध्दीपत्रक (ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-4816/प्र.क्र.136/आस्था-14, दिनांक 2 जाने.2017
4) शासन पुरकपत्र(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14, दिनांक 7 मार्च 2019
5) शासन पुरकपत्र(ग्राम विकास विभाग) क्र.जिपब-4817/प्र.क्र.228/आस्था-14, दिनांक 8 मार्च 2019
6) या कार्यालयाचे पत्र क्रमांक/यजिप/साप्रवि/आस्था-4/वशि/603/2023 दि.5 एप्रिल 2023

परिपत्रक

उपरोक्त संदर्भीय क्रमांक 1 ते 5 अन्वये, सन 2023 मधील सर्वसाधारण बदल्याकरिता वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करण्यासाठी संदर्भीय क्रमांक 6 अन्वये,सा.प.वि.संवर्गातील गट-क कर्मचा-यांची सर्व विभाग व पंचायत समितीकडून माहिती मागविण्यात आली होती.त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सहाय्यक प्रशासन अधिकारी,कनिष्ठ प्रशासन अधिकारी,विस्तार अधिकारी(सां),वरिष्ठ सहाय्यक व कनिष्ठ सहाय्यक या संवर्गाच्या वास्तव्य सेवा जेष्ठता यादया तयार करुन,यवतमाळ जिल्हा परिषदेच्या www.zpyavatmal.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. तसेच सदर यादया सर्व कार्यालय प्रमुखांना ई-मेल व्दारेही पाठविण्यात येत आहे.

सर्व कार्यालय प्रमखांनी, सदर यादया यवतमाळ जिल्हा परिषदेच्या www.zpyavatmal.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्याची माहिती, सर्व संबधीतांना देण्यात यावी. या संबंधात कर्मचा-यांचे काही आक्षेप/हरकती असल्यास योग्य त्या पुराव्यासह **दिनांक 2 मे 2023 पर्यंत या कार्यालयास सादर करावे.**

तसेच सदर तात्पुरत्या वास्तव्य जेष्ठता यादीतील कर्मचा-यांचे सेवाकालावधी व इतर बाबी तपासून त्यात काही त्रुटी आढळल्यास किंवा सुधारणा करावयाची असल्यास तसे **दिनांक 2 मे 2023** पर्यंत सामान्य प्रशासन विभागास योग्य त्या पुराव्यासह कळवावे.

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**

**प्रतिलीपी माहितीकरिता सादर-**
१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,यवतमाळ
**प्रत माहितीकरिता तसेच कार्यवाहीकरिता**
2) खाते प्रमुख/विभाग प्रमुख (सर्व) जिल्हा परिषद,यवतमाळ
3) गट विकास अधिकारी पंचायत समिती (सर्व)

**उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा)**
**जिल्हा परिषद,यवतमाळ**